ॲब्बोट इंडिया लिमिटेड

Abbott

सीआयएन: एल२४२३९एमएच१९४४पीएलसी००७३३०
नोंदणीकृत कार्यालय: ३, कॉर्पोरेट पार्क, शीव-तुर्भे रोड, मुंबई-४०००७१.
दूरध्वनी क्रमांक: ०२२-५०४६१०००/ २०००/ ६७९७८८८८ फॅक्स नं.: ०२२-५०१६९४००
ईमेल आयडी: **investorrelations.india@abbott.com** संकेतस्थळ: **www.abbott.co.in**

व्हिडीओ-कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / अदर ऑडीओ-व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'') याद्वारा घेण्यात येणाऱ्या शहात्तराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, दूरस्थ ई-मतदान व पुस्तिका बंद तसेच लाभांश माहिती याबाबत सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की, ॲब्बोट इंडिया लिमिटेडची (''कंपनी'') शहात्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') ७६व्या एजीएमच्या सूचनेमध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या कामकाजावर विचाराविनिमय करण्याकरिता आणि कंपन्या अधिनियम, २०१३च्या अन्य सर्व लागू तरतुदी तसेच अनुक्रमे दिनांकित ०८ एप्रिल, २०२० व १३ एप्रिल, २०२० परिपत्रक क्र. १४/२०२० व १७/२०२०, त्यानंतरचे निगम कामकाज मंत्रालयाद्वारा (''एमसीए परिपत्रके'') निर्गमित केलेल्या दिनांकित ०५ मे, २०२० परिपत्रक क्र. २०/२०२० च्या अनुसार व्हिडीओ-कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'') याद्वारा **सोमवार, ०७ सप्टेंबर, २०२० रोजी स. ०९.०० वा.** घेण्यात येणार आहे.
एमसीए परिपत्रके आणि दिनांकित १२ मे, २०२० सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडीर/सीआयआर/पी/२०२०/७९ च्या अनुपालनार्थ ७६व्या एजीएमच्या सूचनेसह वित्तीय वर्ष २०१९-२० करिता वार्षिक अहवाल सदस्यांना, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत, इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा आज म्हणजेच शनिवार, १५ ऑगस्ट, २०२० रोजी पाठविण्यात येत आहेत.
ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी खाली दिलेल्या प्रक्रियेचे अनुपालन करून नोंदणीकृत करावेत:

- जर भाग प्रत्यक्ष स्वरूपात असल्यास, कृपया फोलिओ नं., भागधारकांचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), इ. ची investorrelations.india@abbott.com यावर ईमेल करून तरतूद करावी.
- जर भाग डिमॅट स्वरूपात असल्यास, कृपया डीपीआयडी-सीएलआयडी (१६ डिजिट डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ डिजिट बेनिफिशिअरी आयडी), नाव, क्लाइंट मास्टर किंवा एकत्रिकृत अकाऊंट स्टेटमेंटची प्रत, पॅन (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), इ.ची investorrelations.india@abbott.com यावर ईमेल करून तरतूद करावी.

ईमेल पत्त्याची यशस्वीरीत्या नोंदणी झाल्यानंतर, सदस्यास या सभेमध्ये ई-मतदान सक्षम होण्याकरिता युजर आयडी व पासवर्डसह ई-मतदानाकरिता प्रक्रिया तसेच सूचनेची स्वॉफ्ट प्रत प्राप्त होईल. जर कोणतीही शंका असल्यास investorrelations.india@abbott.com यावरून लेखी विनंती करता येईल.
कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१५ च्या नियम २० यासह वाचलेल्या कलम १०८ आणि रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ४४च्या अनुसार, कंपनी ७६व्या एजीएम बोलाविणाऱ्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक प्रणालीत त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता दूरस्थ ई-मतदान सुविधेची तरतूद करून देते.
सभेमध्ये मतदान करण्याबाबत सुविध करून देण्यात येईल. सभेमध्ये उपस्थित राहणारे सदस्य ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारा याआधी मतदान केले नसल्यास ते सभेमध्ये मतदान करण्यास हकदार असतील. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारा त्यांचे मतदान केले असल्यास तेसुद्धा सभेमध्ये उपस्थित राहू शकतील; परंतु सभेमध्ये त्यांना पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
कंपन्या अधिनियम, २०१३ आणि त्याखालील नमूद केलेले नियमाअंतर्गत आवश्यक तपशील याखाली देण्यात आला आहे:

१. एजीएमची सूचना आणि ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक अहवाल **www.abbott.co.in** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि **www.bseindia.com** या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर व **www.evoting.nsdl.com** या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'')च्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.
२. कंपनीने कंपनीच्या सदस्यांना इलेट्रॉनिक प्रणालीत मतदान सुविधेची तरतूद करून देण्याकरिता नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'')ची नियुक्ती केली आहे.
३. दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे:

दूरस्थ ई-मतदान सुरू होईल	**शुक्रवार, ०४ सप्टेंबर, २०२० रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे) पासून**
दूरस्थ ई-मतदान संपेल	**रविवार, ०६ सप्टेंबर, २०२० रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत**

दूरस्थ ई-मतदानास पूर्वोक्त तारीख व वेळेनंतर अनुमती दिली जाणार नाही आणि दूरस्थ ई-मतदान प्रणाली पूर्वोक्त कालावधीच्या समाप्तीनंतर ''एनएसडीएल''द्वारा निःसमर्थ करण्यात येईल.
४. **दूरस्थ ई-मतदान व वार्षिक सर्वसाधारण सभेमधील मतदान या प्रयोजनार्थ कट-ऑफ तारीख ३१ ऑगस्ट २०२०** (''कट-ऑफ तारीख'') **ही आहे.** ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ तारखेनुसार सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत अभिलिखित आहे तीच केवळ दूरस्थ ई-मतदान सुविधा तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेमधील मतदानाच्या सुविधेचा लाभ घेऊ शकेल.
५. सदस्यांच्या मतदानाचा हक्क कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समन्याय भागभांडवलाच्या त्यांच्या भागांच्या प्रमाणशीर असेल.
६. ज्या सदस्यांचे ईमेल आयडी कंपनीकडे नोंदणीकृत आहेत त्यांना युजर आयडी व पासवर्ड ''एनएसडीएल''द्वारा ईमेलमार्फत पाठविण्यात येतील. जे सदस्य याआधीच ''एनएसडीएल''कडे नोंदणीकृत आहेत ते मतदानाकरिता त्यांच्या विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकतील.
७. कोणत्याही व्यक्तीजवळ कंपनीचे भाग आहेत आणि सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे सदस्य बनते व कट-ऑफ तारखेनुसार तिच्याजवळ भाग आहेत ती **evoting.nsdl.com** यावर विनंती पाठवून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल.
८. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदानाची सुविधा करून देण्यात येईल. सभेमध्ये उपस्थित राहणारे सदस्य व ज्यांनी दूरस्थ ई-मतदान सुविधेद्वारा याआधी त्यांचे मतदान केलेले नाही ते सभेमध्ये मतदान करण्यास सक्षम असतील.
९. जे सदस्य दूरस्थ ई-मतदान सुविधेद्वारा मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होऊ शकतील परंतु सभेमध्ये त्यांना पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
१०. सदस्याद्वारा ठरावावर दूरस्थ ई-मतदान सुविधेद्वारा एकदा मतदान केले गेल्यास त्यास सदर मतदानात फेरबदल करण्यास किंवा पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
११. श्री. तैझून एम. खुमारी, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस नं. ८८) (सदस्यत्व क्र.: एफसीएस ९९३) यांची ई-मतदान प्रक्रियेची रास्त व पारदर्शक पद्धतीने छाननी होण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
१२. परिनिरीक्षक सभेमधील मतदान संपल्यानंतर, सभेमध्ये झालेल्या मतांची गणना करतील आणि कंपनीचे कर्मचारी नसलेल्या किमान दोन साक्षीदारांसमक्ष दूरस्थ ई-मतदान सुविधेद्वारा होणारे मतदान अनावरोधित (अनब्लॉक्ड) करतील आणि उशिरात उशिरा वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांत अध्यक्ष किंवा त्याच्याद्वारा लिखित अधिकृत केलेली व्यक्ती, जर असल्यास, बाजूने किंवा विरोधात झालेल्या एकूण मतांचा एकत्रिकृत परिनिरीक्षकांचा अहवाल, जे सदर अहवाल काऊंटरसाइन करतील व त्वरित मतदानाचा निकाल जाहीर करतील.
१३. निकाल वार्षिक सर्वसाधारण सभा संपताच अठ्ठेचाळीस तासांत किंवा लिखित त्यांच्याद्वारा कोणतीही अधिकृत व्यक्ती किंवा अध्यक्षद्वारा घोषित करण्यात येईल. घोषित निकाल परिनिरीक्षकांच्या एकत्रिकृत अहवालासमवेत त्वरित **www.abbott.co.in** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि **www.evoting.nsdl.com** या ''एनएसडीएल''च्या वेबसाइटवर प्रस्तुत करण्यात येईल. निकाल एकाच वेळी बीएसई लिमिटेड, मुंबईकडे पाठविला जाईल.
१४. सविस्तर प्रक्रिया व मतदानाची पद्धत वर्ष २०१९-२० करिता वार्षिक अहवालासमवेत ईमेलद्वारा सदस्यांना पाठविण्यात आलेल्या एजीएमच्या सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात आली आहे.
१५. **मतांच्या आवश्यक संख्येच्या विषयाधीन, ठराव वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेदिवशी म्हणजेच ०७ सप्टेंबर, २०२० रोजी मंजूर झाल्याचे मानण्यात येईल.**
१६. सदस्यास कोणतीही शंका असल्यास ते **www.evoting.nsdl.com** यावरील डाऊनलोड सेक्शनवर उपलब्ध असलेल्या (१) दूरस्थ ई-मतदान युजर मॅन्युअल किंवा (२) हेल्प अँण्ड फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू'ज) पाहू शकतील किंवा टोल-फ्री क्र.: १८००-२२२-९९० यावर कॉल करू शकतील.
१७. सदस्य खालील ठिकाणी दूरस्थ ई-मतदानासंबंधित त्यांच्या शंका / तक्रारी संबोधित करू शकतील:

तपशील	नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड	ॲब्बोट इंडिया लिमिटेड
नाव व पदनाम	श्रीमती सरिता मोटे साहाय्यक व्यवस्थापक	श्रीमती कृपा आनंदपारा कंपनी सचिव
पत्ता	ट्रेड वर्ल्ड, ''ए'' विंग, ४ था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०००१३.	१६ वा मजला, गोदरेज बीकेसी, प्लॉट सी-६८, ''जी'' ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, एमसीए क्लबजवळ, बांद्रा (पू.), मुंबई-४०००५१
टेलि.	+९१-२२-२४९९४८९०	+९१-२२-५०४६१०००/२०००
ई-मेल आयडी	evoting@nsdl.co.in / saritam@nsdl.co.in	investorrelations.india@abbott.com

याअधिक सूचना देण्यात येते की, कंपन्या अधिनियम, २०१३ (''कायदा'') च्या कलम ९१च्या तरतुदी आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, (''रेग्युलेशन्स'')च्या अनुसार लाभाधिकारी मालकांची नोंदवही, कंपनीच्या सदस्यांची नोंदवही व भाग हस्तांतरण पुस्तिका मंगळवार, ०१ सप्टेंबर, २०२० पासून ते सोमवार, ०७ सप्टेंबर, २०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.
रुपये १०/- अंतिम लाभांश व ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाकरिता रु. १४३/- प्रति समन्वय भागाचा विशेष लाभांश, संचालक मंडळाद्वारा शिफारस केल्यास, होणाऱ्या एजीएममध्ये सदस्यांद्वारा मंजूर झाल्यास, अशा सदस्यांना ज्यांनी त्यांचा बँक अकाऊंट तपशील अपडेट केलेला आहे आणि ज्या सदस्यांची नावे या प्रयोजनार्थ डिपॉझिटरीजद्वारा भरलेल्या तपशिलानुसार, ३१ ऑगस्ट, २०२० रोजीप्रमाणे भागांचे लाभाधिकार मालक आणि ०७ सप्टेंबर, २०२० रोजीप्रमाणे सदस्यांच्या नोंदवहीत आलेली आहेत अशा सदस्यांना विविध ऑनलाइन ट्रान्सफर प्रणालीद्वारा इलेक्ट्रॉनिक पद्धतीत १४ सप्टेंबर, २०२० रोजी किंवा त्या तारखेपासून प्रदान करण्यात येईल. ज्या सदस्यांनी त्यांचा बँक अकाऊंट तपशील अपडेट केलेला नाही त्यांना एकदा टपाली सेवा पूर्ववत झाल्यानंतर त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर डिमांड ड्राफ्ट्स पाठविण्यात येतील. अंतिम लाभांशास उशिरा होणे टाळण्याकरिता सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पेआऊट तारखेदिवशी त्यांच्या बँक अकाऊंटमध्ये लाभांशाची थेट स्वीकृती होण्याकरिता **einward.ris@kfintech.com** यावर पॅन व आधार कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत व कॅन्सल्ड चेकच्या प्रतीसह यथोचितरीत्या स्वाक्षरीकृत विनंतीपत्राद्वारा कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजन्टकडे (जेथे ज्यांचे भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत) आणि त्यांच्या डिपॉझिटरीजकडे (जेथे त्यांचे भाग डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात आहेत) त्यांचा केवायसी तपशील अपडेट करावा.
सदस्यांनी याअधिक नोंद घ्यावी की, फायनान्स ॲक्ट, २०२० द्वारा दर्शविलेल्या सुधारणांच्या अनुसार कंपनीला ०१ एप्रिल, २०२० च्या प्रभावापासून तिच्या सदस्यांना केलेल्या लाभांशावरील विहित कर लादणे आवश्यक आहे. निवासी व्यक्तिगत सदस्यांकरिता लाभांशाच्या प्रदानावर, जर ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्ष कालावधीतच एकूण लाभांशाचे प्रदान केलेले असल्यास, कराची वजात केली जाणार नाही.
असलेला कर दर सदस्यांच्या निवासी दर्जेवर व कंपनीकडे असलेल्या कागदपत्रांवरील विभिन्नतेवर आधारित असेल. लागू असल्यानुसार योग्य टीडीएस दर निश्चित करणे आम्हास सक्षम होण्याकरिता सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी **https://ris.kfintech.com/form15/** या लिंकद्वारा आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदींच्या अनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. कागदपत्रांच्या अपलोडिंगकरिता सविस्तर पत्रव्यवहार लागू तरतुदींच्या अनुसार स्वतंत्ररीत्या पाठविण्यात आला आहे.

मंडळाच्या आदेशाद्वारा
कृपा आनंदपारा,
कंपनी सचिव
सदस्यत्व क्र.: एसीएस१६५३६

स्थळ: मुंबई
तारीख: १५ ऑगस्ट, २०२०